**L. A. BILL No. XCIX OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2023.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९.**

**महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२४ चा महा. ८. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीमधील, भाग दोन मध्ये, नोंद ८ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :— २०२४ चा महा. ८.

| | | |
|---|---|---|
| "९. | जियो विद्यापीठ, अंतरिम कॅम्पस, इमारत ए, सेक्टर-४, उल्वे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१० २०६.<br>कायमस्वरूपी कॅम्पस - पॉकेट ८ - २, सेक्टर - ८, द्रोणगिरी, तालुका उरण, जिल्हा रायगड-४०० ७०२. | रिलायन्स फाउंडेशन, इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, ९ वा मजला, प्लॉट २२२, ईस्ट विंग, मेकर चेंबर्स चार, जे. बी. मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.". |

# उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. ८) हा, महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यामध्ये स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठाची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्यासाठी अधिनियमित केला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या उक्त कलम ६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे अशी शासनाची खात्री पटल्यानंतर, शासन, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून अनुसूचीमध्ये केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोन मध्ये, खाजगी विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय समाविष्ट करून, त्याद्वारे खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देऊ शकेल.

**३.** उक्त अधिनियमाच्या उक्त कलम ६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीद्वारे सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, “जियो विद्यापीठ” या नावाने खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी रिलायन्स फाउंडेशन, इन्स्टिट्यूशन ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, ९ वा मजला, प्लॉट २२२, ईस्ट विंग, मेकर चेंबर्स ४, जे. बी. मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ या प्रायोजक मंडळाने कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे.

**४.** म्हणून, जियो विद्यापीठ हे स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ म्हणून स्थापन करण्यासाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोन मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक ८ डिसेंबर, २०२५.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९.]**

**[महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव - १,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

HB-1123-2